निसर्गाने दिले अन् शासनाच्या धोरणाने नेले.. >>पान 2

उमरखेड शहरात विविध ठिकाणी जनावरांसाठी जलकुंड उभारले >>पान 3

डोणगाव येथे मध्यरात्री अग्नी तांडव ; तब्बल नऊ दुकाने जळून खाक : वीस लाखाच्या वर नुकसान >>पान 4

**सुविचार**

कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 208 ■ मंगळवार, दि. 11 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मला असा जोडीदार हवा, ऐश्वर्या रायच्या वक्तव्याने बॉलिवूडमध्ये खळबळ! आतील पान

# महाराष्ट्र आता थांबणार नाही : अजित पवार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : अर्थमंत्री अजित पवारांनी छत्रपती शिवाजी महाराजांसह सर्वच महापुरुषांना वंदन करुन महाराष्ट्र सरकारचा यंदाचा २०२५-२६ अर्थसंकल्प वाचण्यास सुरुवात केली. आज मी माझ्या आयुष्यातील ११ वा अर्थसंकल्प सादर करत असल्याचे त्यांनी म्हटले. केंद्रीय अर्थसंकल्पीय तरतुदींमुळे राज्याच्या पायभूत सुविधांना बळ मिळणार आहे, त्यामुळे राज्याच्या जनतेच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानतो, असे म्हणत अजित पवारांनी महाराष्ट्र सरकारचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर केला. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात अजित पवारांनी महाराष्ट्राचा विकास, पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, परकीय गुंतवणूक, आद्यौगिक क्षेत्रातील वाढ यांसह विविध विषयांवर भाष्य केलं.**



लाडक्या बहिणी मिळाल्या धन्य झालो, केली विकासाची कामे म्हणून आम्ही पुन्हा आलो.. पुन्हा आलो.. असे म्हणत लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळेच राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार आल्याचं अजित पवार यांनी सूचवलं. महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकसित भारत, विकसित महाराष्ट्राचे लक्ष्य ठेऊन महाराष्ट्र विकासाचे काम हाती घेण्यात आलं आहे. महाराष्ट्रात देशी व विदेशी गुंतवणूक आकर्षित होत आहे. १५ लाख ७२ हजार ६५४ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात होत आहे. त्यातून, लाखो रोजगार निर्मिती होणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितलं. राज्य सरकारचा १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रशासन कार्यक्षम होईल यात शंका नाही. राज्याचे नवीन औद्योगिक धोरण जाहीर होईल ५० लाख नोकऱ्यांचा उद्देश सरकारच्या समोर असेल, असे अजित पवार यांनी म्हटले. तसेच, स्वतंत्र शेती धोरण जाहीर करणार आहोत, अशी माहिती देखील त्यांनी दिली.

## मुंबईसाठी बजेटमध्ये काय घोषणा

राज्याचे लॉजिस्टिक्स धोरण जाहीर करण्यात आले आहे. ५ लाख प्रत्यक्ष अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण करण्यात येणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ऋवांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार - बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. ऋत्यामुळे, मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० बिलियन डॉलरवरून सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर, तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथून मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासाकरिता अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात येणार आहे.

## गडचिरोली जिल्ह्यासाठी घोषणा

एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत आहे. ऋदावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. ऋत्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे. ऋगडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात असून त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

## वीजनिर्मित्ती आणि नागरिकांना वीजेचा लाभ

महावितरण कंपनीने येत्या ५ वर्षांसाठी वीजेचे दर निश्र्चित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला आहे. ऋऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे येत्या पाच वर्षात वीज खरेदी खर्चामध्ये १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे, राज्यातील औद्योगिक वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत कमी होतील.

## आशियाई विकास बँक प्रकल्प, रस्ते बांधणी

आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा-१ पूर्ण झाला आहे. टप्पा-२ मधील ३ हजार ९३९ कोटी रुपये किंमतीची ४६८ किलोमीटर रस्ते सुधारणांची कामे हाती घेण्यात आली असून त्यापैकी ३५० किलोमीटर लांबीची कामे पूर्ण झाली आहे. ऋटप्पा-३ अंतर्गत ७५५ किलोमीटर रस्ते लांबीची ६ हजार ५८९ कोटी रुपये किंमतीची २३ कामे हाती घेण्यात आली आहेत. - सुधारित हायब्रीड न्युईटी योजनेअंतर्गत ६ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सिमेंट काँक्रीटीकरणाची कामे सुरू आहेत, ऋया कामांची किंमत ३६ हजार ९६४ कोटी रुपये आहे. - प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -३ अंतर्गत ६ हजार ५०० किलोमीटर लांबीची, ५ हजार ६७० कोटी रुपये किंमतीची कामे मंजूर असून त्यापैकी ३ हजार ७८५ किलोमीटर लांबीची कामे पूर्ण झाली आहेत. ऋसन २०२५-२६ साठी १५०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते कामे



मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ ची कामे पूर्णत्वास आली असून टप्पा-२ अंतर्गत ९ हजार ६१० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची कामे मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ऋमुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत अतिरिक्त ७ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. ऋमुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३ हजार ५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जातील. ऋया प्रकल्पाची एकूण किंमत ३० हजार १०० कोटी रूपये आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटी रूपये रकमेची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

## मुंबई, पुणे, नागपूर मेट्रो

- मुंबई, नागपूर व पुणे महानगरांतील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्र्वत, विनाअडथळा व वातानुकुलित वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले आहेत.
- या सेवेचा लाभ सुमारे १० लाख प्रवासी रोज घेत आहेत
- येत्या वर्षात मुंबईमध्ये ४१.२ किलोमीटर, तर पुण्यामध्ये २३.२ किलोमीटर असे एकूण ६४.४ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग सुरू होणार आहेत
- येत्या ५ वर्षांत एकूण २३७.५ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात येणार आहेत.
- नागपूर मेट्रोचा ४० किलोमीटर लांबीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यात ६ हजार ७०८ कोटी रुपये किंमतीचे ४३.८० किलोमीटर लांबीचे काम प्रगतीपथावर आहे
- ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे



- पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला - स्वारगेट - हडपसर - खराडी आणि नळ स्टॉप - वारजे - माणिकबाग या दोन मार्गिकांचा ९ हजार ८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे
- मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

# सर्वसामान्य जनतेच्या तोंडाला पाने पुसणारा बजेट - बळवंत वानखडे




**अमरावती/प्रतिनिधी :** राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशन सादर केले. शेतकऱ्यांना कर्जमाफी होईल, आमच्या लाडक्या बहिणीला २१०० रुपये, काही मोठ्या घोषणा होतील परंतु पोकळ घोषणांचा पाऊस पाडून आज हे बजेट सादर झाले आहे. जे आश्र्वासन निवडणुकीच्या काळात दिले होते. त्या आश्र्वसनांची पूर्तता झालेली दिसून येत नाही. हे बजेट जे आहे ते सर्वसामान्यांच्या तोंडाला पाने पुसणारा आहे. उद्योगधंदे बघता या बजेटमध्ये नागरिकांना दिसून येते नाही.

# सादर केलेला अर्थसंकल्प हा निराशाजनक

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा पत्रकार परिषद आरोप

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अर्थसंकल्प हा निराशाजनक आहे.कोणताही ताळमेळ नाही, ज्या तरतूदी आहेत. त्या झाल्या नाहीत.असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत केला.



यावेळी ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, महाराष्ट्र थांबणार नाही. मात्र, महाराष्ट्र मागे जात आहे. हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला देशोधडीला लावणारा आहे. ट्रिपल इंजिन सरकारने नवीन पॅकेज न आणता, नवीन योजना न आणता, ती आशा फोल ठरली आहे. लाडक्या बहिणीची दहा लाख संख्या कमी करून कात्री लावली. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली नाही. केवळ शब्दांचा पसरा मांडलेला अर्थ संकल्पात दिसून येतो. महाराष्ट्राला फसवणारा अर्थसंकल्प आहे. बेरोजगारांच्या समस्या ही जशाच्या तशा ठेवण्यात आल्या आहेत. वीज बिल कपात करू असे सांगताना स्मार्ट मीटर आणणारा नाही हे सांगणे आवश्यक होते. स्मार्ट मीटरच्या नावाने अतिरिक्त पैसे उकळले जाणार आहे. स्मार्ट मीटर ही योजना ग्राहकांना फसवणारी आहे.दोन हजार कोटींचा भ्रष्टाचार एसटी मध्ये झाला आहे. सिंचनामध्ये काळेबेरे लपविण्यासाठी त्याबाबतीत ही काही बोलले नाहीत. हा अर्थ संकल्प फसवा नसून रडवा अर्थ संकल्प आहे. महाराष्ट्रात अनेक उद्योग गेले, आणि इकडे उद्योग यायला तयारी नाही.कायदा सुवेस्थेची परिस्थिती बिकट झालीय. उद्योगपतींना संरक्षण नाही, त्यामुळे ते यायला तयार नाहीत. दरडोई उत्पन्न कमी होत असून कर्जाचा डोंगर वाढत चाललेला आहे. कर्ज काढून काढून जनतेला देशोधडीला लावण्याचा अर्थ संकल्प आहे. अर्थ संकल्पात ताळमेळ नाही, खर्चाचे उत्पन्नाचे कुठलेही नियोजन नाही. शेतकरी, महिला, बेरोजगार यांच्यासंदर्भात निराशाजनक अर्थ संकल्प आहे. गेल्या काही दिवसांपासून धंगेकर जाणार जाणार अशी चर्चा ऐकत आहोत. दरम्यान काँग्रेसने त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्ना केला. यापूर्वी त्यांना काँग्रेसने तीन वेळा उमेदवारी दिली. मात्र, ते जर काही व्यक्तिगत अडचणीमुळे जात असतील तर, भाजपा, शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राजकारणाचा बळी आहे जो तो म्हणतो की सत्तेशिवाय काम होत नाही. मग सगळेच सत्ता सत्ता करायला लागले तर विचारांचे काय? असा प्रश्न उपस्थित करत धंगेकर यांना कोण होतास तू काय झालास तू. अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

# पोकळ वल्गना करणारा अर्थसंकल्प : आ. खरात

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** विशेषता शेतकरी, महिला आणि बेरोजगार युवकांच्या डोळ्यात धुळफेक करणारा आहे. मागील दोन वर्षांपासून ज्या योजना चालू होत्या. त्याच योजना चालू आहेत. नाविण्यपूर्ण कोणतीही नवीन योजना सुरू करण्यात आल्या नाहीत.रस्त्याचे जाळे त्यांच्या बजेटमध्ये प्रस्ताविक केलेले आहे. महिलांसाठी १५०० रुपये महिना देण्याचे जाहीर केले होते. प्रत्यक्षात महिलांची संख्या कमी होत आहे. आणि २१०० रुपये देण्याचे वचन पाळल नाही. ४६ हजाराचा जो काही वार्षिक बजेट करण्यात आले होते. पुढच्यावर्षी ३६ हजार कोटीचे बजेट केले आहे. परंतु, सांगतात एक आणि करतात एक असा काम सरकार करीत आहे. शेतकजयांच्या संदर्भातही तेच सुरू आहे. ६ फेब्रवारीपासून नाफेडने खरेदी बंद आहे. त्यामुळे सोयाबीन पडून आहे. शेतकरी कर्जमाफीचे जाहीरनाम्यात होते. मात्र ते पाळण्यात आले नाही. हा अर्थसंकल्प हा अत्यंत निराशाजनक आहे. उद्धव साहेब यांनी म्हटल्याप्रमाणे मागील दहा वर्षातील हा सर्वात बोगस अर्थसंकल्प आहे. असे म्हणाले लागेल.असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले.

## चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन!

९ मार्च २०२५ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी मिनी वर्ल्डकप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर चार गडी राखून विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफीवर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास घडवला. यावेळची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई या देशात खेळली गेली. या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला चॅम्पियन करायचेच अशी खूणगाठ कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती. विश्र्व कसोटी चॅम्पियन स्पर्धेत (ींल ) भारतीय संघाला अंतिम फेरीत पोहाचवण्यास आलेले आल्यास अपयश आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील पराभव विसरून त्यांनी नव्याने सुरुवात केली. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार रोहित शर्माच्या मनात होता. त्याने निवड समितीकडून त्याला हवे ते खेळाडू घेतले. दुबईतील खेळपट्टी फिरकीला अनुकूल असल्याने त्याने पाच फिरकी गोलंदाजांना संघात घेतले त्यातील रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या चार फिरकी गोलंदाजांना त्याने अंतिम अकरा मध्ये खेळवले आणि चारही फिरकी गोलंदाजांनी त्यांच्यावर टाकलेला विश्र्वास सार्थ ठरवत अप्रतिम कामगिरी केली. या चौघांना जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी , हार्दिक पांड्या आणि हर्षित राणा यांनी सुरेख साथ दिली. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला. अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती चारही फिरकी गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले. त्यांना मोहम्मद शमी आणि हार्दिक पांड्या ने सुरेख साथ दिल्याने भारताने न्युझीलंड संघाला अवघ्या २५१ धावात रोखले. न्युझीलंड संघाने डावाची सुरुवात तर धमाकेदार केली पण रचीन रवींद्र आणि केन विल्यम्सन हे त्यांचे भरावशाचे फलंदाज बाद झाल्यावर भारताच्या फिरकी गोलंदाजांनी फास आवळला आणि न्यूझीलंडच्या फलंदाजांना वेसण घातली त्याचा परिणाम असा झाला की त्रिशतकी मजल मारणारा न्युझीलंडचा संघ २५१ धावाच करू शकला. न्युझीलंड संघाला २५१ धावांवर रोखून भारताने अर्धी लढाई जिंकली. केवळ गोलंदाजांनीच नव्हे तर फलंदाजांनीही छान कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने ७४ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आणि शुभमन गीलने शतकी सलामी देऊन विजयाचा पाया रचला. रोहित शर्मा हाच अंतिम सामन्याचा मानकरी ठरला. विराट कोहली स्वस्तात बाद झाला तरी श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि हार्दिक पांड्या यांनी भारताला विजयी केले. अंतिम सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारताच्या गोलंदाज आणि फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली . या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विजेतेपद मिळवले. रोहित शर्माने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला. भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद आहे. २००२ साली भारताने श्रीलंके सोबत संयुक्त विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार सौरभ गांगुली हा होता . त्यानंतर २०१३ साली महेंद्रसिंग धोनी कर्णधार असताना भारताने इंग्लंडला हरवून दुसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती त्यानंतर बारा वर्षानंतर भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून भारताने आम्हीच चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्र्वावर आपली हुकूमत पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग तीन स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला दोनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्र्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून मात्र त्यानंतर मागील वर्षी टी २० विश्र्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्र्व विजेतेपद मिळवले होते आणि आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्र्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवणाऱ्या चॅम्पियन्स भारतीय संघाचे हार्दिक हार्दिक अभिनंदन!

# निसर्गाने दिले अन् शासनाच्या धोरणाने नेले..

## शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, नाफेडची खरेदी बंद; सिद्धार्थ खरात यांनी विधानसभा सभागृहात अभिभाषणादरम्यान प्रश्न केले उपस्थित

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/विशेष प्रतिनिधी :** शेतकऱ्यांनी रात्रीचा दिवस व रक्ताचे पाणी करून शेतात प्रचंड प्रमाणात शेतमाल पिकविला आहे. मात्र, शासनाच्या चुकीच्या धोरणाने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे निसर्गाने दिले आणि शासनाच्या चुकीच्या धोरणांनी नेले... अशी गत शेतकऱ्यांची झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव द्यावा किंवा भाव फरकाचा मोबदला द्यावा, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभा सभागृहात अभिभाषणादरम्यान केले.




आमदार सिद्धार्थ खरात यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर समस्यावर प्रश्न उपस्थित करत शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याची मागणी केली. त्याचबरोबर अत्यल्प दराने विकल्या जाणाऱ्या सोयाबीनचे व निवडणुकीदरम्यान जाहीर नाम्यात सहा हजार रुपये क्विंटल भाव देण्याचे आश्र्वासनाकडे शासनाचे लक्ष वेधले. यावेळी ते म्हणाले की, यावर्षी निसर्गाच्या कृपेने प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांनी उत्पादन काढले आहे. मात्र, सोयाबीनला गेल्या दहा वर्षाच्या काळातील सर्वात कमी दर मिळाला आहे.निवडणूक काळात सत्ताधाऱ्यांनी सहा हजार रुपये प्रति क्विंटल याप्रमाणे सोयाबीनला भाव देऊ असे आश्र्वासन दिले होते.

मात्र, संपूर्ण सोयाबीन हंगाम आटोक्यात येत असतानाही सोयाबीनला हमीभाव देण्यात आला नाही. शासन ११ लाख क्विंटल सोयाबीनचे हमीदराने खरेदी केल्याचे सांगीत असले तरी, ५० टक्के पेक्षावर सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे.६ फेब्रुवारीपासून नांदेडची खरेदी बंद केल्याने शेतकऱ्यांवर अत्यल्प दरात सोयाबीन विकण्याची वेळ आली आहे.

सोयाबीन विकण्यासाठी अनेक नियम लावल्याने अर्ध्या अधिक शेतकऱ्यांना या जाचक अटीचा प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक नुकसान लक्षात घेता शासनाने सहा हजार रुपये हमीभाव द्यावा, सोयाबीनला हमीभाव द्यावा त्याचबरोबर नाफेडची खरेदी सुरू करावी व माल विक्री केलेल्या शेतकऱ्यांना भाव फरकाचा मोबदला द्यावा, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी अभिभाषणा दरम्यान विधानसभा सभागृहात केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या इतर समस्याकडे शासनाचे लक्ष वेधले.

## हसन अली प्राथमिक शाळेतील विज्ञान प्रदर्शनमध्ये आकिब खान आजीम खान याचा पहिला क्रमांक



**दैनिक आपला विदर्भ**

**■ महेबूब शेख**

**उमरखेड :** २७ फेब्रुवारी रोजी हसन अली प्राथमिक शाळा आणि हनीफ मास्टर उर्दू हायस्कूलच्या परिसरात हसन अली प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन, सुंदर कलाकुसर आणि मॉडेल्स प्रदर्शित केले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जानब सय्यद मकसूद अली पटेल यांनी रिबन कापून केले होते. यावेळी जानब सय्यद मकसूद अली पटेल यांनी हसन अली प्राथमिक शाळेतील विज्ञान मॉडेल प्रदर्शनमध्ये सहभागी आकिब खान अझीम खान याने पहिला क्रमांक पटकवीला तर, अमायरा सय्यद एजाज २रा,आणि आयरा अनम शेख एजाज तिसरा मिळवल्याबद्दल ट्रॉफी देऊन सत्कार केला. तसेच कलाकृती प्रदर्शन अलिझा फातेमा शेख अझगर पहिला क्रमांक, अन्शारा शेख अहमद २ रा, मुबाशहरा सय्यद रफीक तिसरा,अरहान शेख रहीम तिसरा यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सलीम वकील सौदागर होते. तर प्रमुख पाहुणे सबदर ठेकेदार, जब्बार भाई, हाजी शेख अजीज, शेख ईनायत पेंटर, पत्रकार अजीज खान , शे.फिरोज, इत्यादी पालक वर्ग आणि हनीफ मास्टर उर्दु हा.स्कूल ढाणकीचे सर्व शिक्षक देखील उपस्थित होते. हसन अली प्राथमिक शाळेतील मॅडम मुस्कान परवीन, मॅडम गुलनाझ, मॅडम इरम सबा, मॅडम अफशान महीन, मॅडम सानिया फिरदौस यांनी मॉडेल प्रदर्शन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आणि विद्यार्थ्यांना मॉडेल बनवण्यात मार्गदर्शन करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले होते.

## मला असा जोडीदार हवा, ऐश्वर्या रायच्या वक्तव्याने बॉलिवूडमध्ये खळबळ!

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूडची सौंदर्यवती आणि करिष्माई अभिनेत्री ऐश्वर्या राय यांनी २० एप्रिल २००७ रोजी अभिषेक बच्चन यांच्यासोबत विवाह केला. दोघांना आराध्या बच्चन नावाची मुलगी आहे. एकेकाळी आदर्श जोडप्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या जोडीबाबत सध्या विभक्त होण्याच्या चर्चांना वेग आला आहे.

अभिषेकसोबत विवाह करण्यापूर्वी ऐश्वर्याने एका मुलाखतीत तिच्या स्वप्नातील जोडीदाराविषयी बोलताना त्याच्यात कोणते गुण असावेत, हे स्पष्ट केले होते. ती म्हणाली होती की, मला असा जोडीदार हवा होता, जो मला मनापासून प्रेम करेल, कारण स्वभावतःच मी रोमँटिक आहे. तसेच, तिने स्वाभिमान आणि प्रतिष्ठेच्या महत्त्वावर भर दिला होता, कारण या दिखाऊ दुनियेत हे गुण दुर्मिळ असल्याचे तिने सांगितले होते.

अभिषेक आणि ऐश्वर्याच्या प्रेमकथेची सुरुवात 'उमराव जान' चित्रपटाच्या सेटवर झाली. मात्र, त्याआधी अभिषेक ऐश्वर्याच्या सौंदर्याने भारावून गेला होता. स्वित्झर्लंडमध्ये तो एका चित्रपटाच्या शूटिंगसाठी गेला असताना, ऐश्वर्या 'और प्यार हो गया' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त होती. त्यानंतर 'गुरु', 'धूम २' आणि 'उमराव जान' या चित्रपटांच्या शूटिंगदरम्यान दोघांमध्ये जवळीक वाढली. अखेर 'गुरु'च्या प्रीमियरला अभिषेकने ऐश्वर्याला प्रपोज केले आणि तिने आनंदाने होकार दिला.ऐश्वर्या रायच्या लग्नाच्या पोशाखाविषयी अनेक अफवा पसरल्या होत्या. काहींनी असा दावा केला की, तिचा पोशाख ७५ लाख रुपयांचा होता. मात्र, फॅशन डिझायनर निता लुल्ला यांनी एका मुलाखतीत या दाव्यांचे खंडन केले.


# समतेचा संदेश देणाऱ्या शिवविवाह सोहळ्याची राज्यभर चर्चा

## शिवविवाह सोहळ्याची चर्चा केवळ धाराशिव जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रभर

**दैनिक आपला विदर्भ**

**धाराशिव/प्रतिनिधी :** मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांच्या कन्या शिवमती तृप्ती आणि शिवमान रणजित यांचा शिवविवाह मोठ्या उत्साहात आणि सामाजिक जाणीव जपत पार पडला. धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे एका आगळ्यावेगळ्या आणि सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या शिवविवाह सोहळ्याची सध्या मोठी चर्चा सुरू आहे. या विवाहाची वैशिष्ट्ये लक्ष वेधून घेणारी होती.

पुस्तकांनी भरलेले कपाट; अनोखी रुखवत परंपरा. या शिवविवाहात सर्वसामान्य विवाहांप्रमाणे पारंपारिक वस्तू देण्यात आल्या नाहीत. सतीश काळे यांनी रुखवत म्हणून मुलीला पुस्तकांनी भरलेले कपाट भेट दिले. ही अनोखी संकल्पना समाजाला ज्ञान आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारी होती. महाराष्ट्रात या कल्पनेचे जोरदार कौतुक होत आहे. आजवर सोने-चांदी भांडीकुंडी किंवा महागड्या भेटी रुखवतामध्ये दिला जातात.









### समाजसुधारणेचा संदेश

समाजसुधारणेचा संदेश देणारी शिवविवाह सजावट हा शिवविवाह पारंपारिक सोळ्यांपेक्षा वेगळा होता. शिवविवाह मंडपात महापुरुषांचे विचारधारेचे फलक लावण्यात आले होते. सामाजिक समतेच्या विचारांचे दर्शन घडवणाऱ्या या मंडपाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या विवाहात धर्मावर आधारित विधींऐवजी सामाजिक विचारांचा प्रभाव असल्याचे दिसून आले.

मात्र काळे यांनी हा पायंडा मोडून समाजासमोर वेगळा आदर्श ठेवल्याचे बोलले जात आहे. लग्नपत्रिकेवर महापुरुषांचे विचार या शिवविवाह सोहळ्याची आणखी एक खासियत म्हणजे शिवविवाहाच्या आमंत्रण पत्रिकेवर देव-देवतांचे फोटो न वापरता महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा छापण्यात आल्या. समतेचा विचार रुजवण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण संदेश देण्याचा प्रयत्न काळे यांनी केला. त्यांच्या या निर्णयामुळे हा शिंवविवाह आगळावेगळा ठरला आणि अनेकांनी याचे कौतुक केले.

### राज्यभरातून कौतुक

या शिवविवाह सोहळ्याची चर्चा केवळ धाराशिव जिल्ह्यातच नव्हे. तर संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे. समाजात बदल घडवण्याचा संदेश देणाऱ्या अशा उपक्रमांकमांचे महत्त्व वाढत असून. अनेकांनी या संकल्पनेचे अनुकरण करावे अशी भावना समाजातील अनेक लोकांनी व्यक्त केली आहे. सतीश काळे यांनी मुलीच्या लग्नाला एक सामाजिक चळवळीचे स्वरूप दिले आणि समता. शिक्षण व विचारांची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाज सुधारण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हा स्पष्ट संदेश या शिवविवाह सोहळ्यात मिळाला. त्यामुळेच हा शिवविवाह महाराष्ट्रात चर्चे चा विषय ठरत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उमरखेड शहरात विविध ठिकाणी जनावरांसाठी जलकुंड उभारले

## यूथ फाउंडेशन चा सामाजिक उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र होत आहे. या कठीण परिस्थितीत मुक्या प्राण्यांची पाण्यासाठी वणवण पाहवली जात नाही. याच पार्श्र्वभूमीवर युथ फाऊंडेशन, उमरखेडच्या वतीने शहरातील विविध भागांत मुक्या प्राण्यांसाठी जलकुंडांची स्थापना करून एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे.

**युथ फाऊंडेशनचा सामाजिक उपक्रम**

युथ फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विवेक पत्रे (ऊछइ मेडिसिन) यांच्या पुढाकाराने हा उपक्रम हाती घेण्यात आला. प्रखर उन्हात भटकणाऱ्या मुक्या प्राण्यांना थंड व स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी शहरातील १० प्रमुख ठिकाणी




जलकुंडांची स्थापना करण्यात आली. आपल्या व्यस्त वैद्यकिय क्षेत्रातून वेळ काढून सर हे नेहमी सामाजीक कार्यात अग्रेसर असतात हा उपक्रम त्यांनी स्वखर्चातून केले मानवजाती सह जनावरांचा देखील विचार करणे म्हणजेच आपल्या पदवीला न्याय देणे होय

**या कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांचा सहभाग**

या समाजोपयोगी उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये डॉ. मुशफिक, डॉ. कुणाल काळे, अभिजित मुळे, दिपक ठाकरे, साबिर नाईक (अध्यक्ष, युथ मूव्हमेंट), डॉ अजित नलावडे आणि कमलेश राठोड,डॉ श्रीराम शिंदे यांचा समावेश होता. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, युथ फाऊंडेशनच्या सामाजिक बांधिलकीची प्रशंसा केली.

**मानवतावादी धर्माचे प्रतीक**

या उपक्रमाबद्दल माहिती देताना डॉ. विवेक पत्रे म्हणाले, उन्हाच्या कडाक्यामुळे पाणी न मिळाल्याने मुक्या प्राण्यांचे हाल होतात. त्यांना मदत करणे हाच खरा मानवतावादी धर्म आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात अशा प्रकारच्या उपक्रमात सहभाग घेतला पाहिजे.

**उपक्रमाची वैशिष्ट्ये**

- उमरखेड शहरातील १० ठिकाणी जलकुंडांची स्थापना.
- मुक्या प्राण्यांसाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची व्यवस्था.
- सामाजिक बांधिलकीतून हाती घेतलेला उपक्रम.
- युथ फाऊंडेशनच्या सदस्यांचा सक्रीय सहभाग.

**सर्वत्र कौतुकाची लाट**

युथ फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे उमरखेड शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये तहानलेली जनावरे आता या जलकुंडांमुळे ताजेतवाने होत आहेत. समाजातील प्रत्येक घटकाने अशा सामाजिक उपक्रमांत योगदान देण्याची गरज असल्याचे नागरिकांनी नमूद केले.

या उपक्रमाच्या माध्यमातून उमरखेडमधील सामाजिक कार्यकर्ते मुक्या प्राण्यांसाठी मोठे योगदान देत आहेत. भविष्यात आणखी जलकुंड उभारण्याचा आणि हा उपक्रम व्यापक स्तरावर राबवण्याचा मानस युथ फाऊंडेशनने व्यक्त केला आहे.

# हिंदू खाटीक महासंघाच्या शिष्टमंडळाने घेतली मंत्री नितेश राणे यांची भेट

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी /प्रतिनिधी :** महाराष्ट्रातल्या हिंदू समाजासाठी एक अतिशय महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. मल्हार सर्टीफिकेशन डॉट कॉम ने ही सुरुवात केली असून, मल्हार सर्टीफिकेशन झटका मटण ही एक नवीन संकल्पना आज पासून हिंदू समाजासाठी आणली जात आहे. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची हिंदू खाटीक महासंघाच्या शिष्ठ मंडळाने भेट घेतली. यावेळी त्यांच्या वेबसाईटचे अनावर मंत्री नितेश राणे यांनी केले.



मल्हार सर्टीफिकेशन झटका मटण या माध्यमातून आपल्याला हक्काचे मटण दुकानं जिथे १००% हिंदू समाजाच प्राबल्य असेल कुठेही त्या मटणामध्ये भेसळ झालेली नसेल. जी काही चुकीची उदाहरणं आपल्या नजरेसमोर येत आहेत मटण मध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी मल्हार सर्टीफिकेशन झटका मटण पद्धती राज्यात अमलात आणली जाणार आहे. हिंदू समाजाला अजून आर्थिक सक्षम करण्यासाठी एक महत्वाचे पाऊल हिंदुत्ववादी विचाराच्या सर्व सहकाऱ्यांनी या निमित्ताने टाकलेले आहे. या झटका मटण मल्हार सर्टिफिकेशनचा वापर आपण जास्तीत जास्त करावा किंबहुना ज्या मटनाला मल्हार सर्टिफिकेशन नसेल तिकडे हिंदू समाजाने खरेदी करू नये असे आवाहन मंत्री नितेश राणे यांनी केले आहे.

# पीक विमा कंपनीने अकोला जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याने शेतकऱ्यांनी आदेशाची होळी करून नोंदवला निषेध



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** पीक विमा कंपनीने अकोला जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याने शेतकऱ्यांनी या आदेशाची होळी करून निषेध नोंदवला आहे. तर प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यातील चार लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी खरीप हंगामात पीक विमा काढला होता. यावर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे जवळपास तीन लाख शेतकऱ्यांना नुकसानीचा सामना करावा लागला, त्यामुळे पीक विमा कंपनीने अनेक शेतकऱ्यांचे पंचनामे केले होते. तर जिल्हास्तरीय पीक विमा समितीचे अध्यक्ष असणारे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी शेतकऱ्यांना २५ टक्के पीक विमा एका महिन्यात शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा असे पत्र काढले.

मात्र, आदेशाला एक महिना उलटून गेला असून अदयापही शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याची रक्कम जमा झाली नाही. या निषेर्धात शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या पत्राची होळी केली आहे. अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच या आदेशाची होळी करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांसाठी घंटानाद आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जुनी पेन्शन योजना लवकर सुरू करण्यात यावी तसेच वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्यात यावी यासह अन्य मागण्या करिता आज बुलढाणा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषद कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन केले आहे. लवकरात लवकर मान्य मान्य करण्यात याव्या अन्यथा यापेक्षा तीव्र स्वरूपाच्या आंदोलन करणार असल्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

राज्यात जिल्हा परिषद अंतर्गत काम करणारा कर्मचाऱ्यांचे दीर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी बुलढाणा जिल्हा परिषद कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांकडून काळा फीती लावून घंटानांद आंदोलन केले आहे. जुनी पेन्शन योजना लवकरात



लवकर लागू करण्यात यावी तसेच लिपिक, लेखा, परिचर, वाहक चालक या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत वाढ करण्यात यावी, ग्रामविकास विभाग शासन निर्णयांतर्गत जिल्हा परिषद मधील लिपिक वर्गांची वर्ग दोन मध्ये पदोन्नती करण्यात यावी, महाराष्ट्र विकास सेवा श्रेणी वर्ग दोन च्या नियमात सुधारणा करण्यात यावी, परिचर व वाहन चालक या पदावर भरती बंदचा आदेश शासनाने रद्द करावा यासह अन्य मागण्यासाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांकडून काळा फिती लावून घंटानंद आंदोलन केले आहे. शासनाने लवकरात लवकर मान्य मान्य करावा अन्यथा यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल असाही इशारा कर्मचाऱ्यांकडून देण्यात आला.

## दुकानदारांची फसवणूक करणारे आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**कल्याण /प्रतिनिधी :** कल्याण पूर्वेतील आर. के. बझार या सुपर मार्केटमध्ये पंकज पाटील आणि अनिल कांबळे गेले होते. त्यांनी किराणा मालाची खरेदी केली. बिल देण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी दुकानदाराला फोन पे वर पैसे देतो. ऑनलाइन पेमेंट करतो असे सांगिलले. हे दोघेही बनावट फोन पे दाखवून खरेदी केलेल्या किराणा मालाचे बिल पेड करीत नव्हते. या प्रकरणी कोळसेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कोळसेवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक गणेश न्यायदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक सिराज शेख आणि सहाय्यक पोलिस निरिक्षक दर्शन पाटील यांनी या गुन्ह्याचा तांत्रिक तपास करीत आरोपींना बेड्या ठोकल्या आहे. अशा प्रकारे या दोन्ही आरोपींनी मानपाडा पोलिस ठाण्यात सुपर मार्केट दुकानदाराची फसवणूक केली होती. या दोन्ही गुन्ह्यात खरेदी केलेला मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. अशा प्रकारे या दोन्ही आरोपींनी अन्य किती सुपर मार्केट दुकानदारांना फसवलं याचा तपास पोलिस करत आहेत.

# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे पाणी खडकपूर्णा धरणात सोडण्याची आमदार मनोज कायंदेची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बिबी :** सिंदखेड राजा मतदारसंघातील खडकपुर्णा नदीवर खडकपुर्णा प्रकल्प हा मोठा प्रकल्प आहे. सदर प्रकल्प पावसाच्या पाण्यामुळे दरवर्षी पुर्ण क्षमतेने भरत नाही. त्यामुळे या प्रकल्पात पाण्याची तुट निर्माण होते. वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार वैनगंगा नळगंगा नदिजोड प्रकल्प ही महत्वाकांक्षी योजना शासन स्तरावर राबविण्यात येत असुन सदर योजनेंतर्गत खडकपुर्णा नदी प्रकल्पाचा समावेश करण्यात यावा अशी मागणी आमदार मनोज कायंदे यांनी एका पत्रकाद्वारे मुख्यमंत्र्याकडे केली आहे त्यामुळे वैनगंगा पैनगंगा नदी जोड प्रकल्पामध्ये खडक पूर्णा ला जोडल्यास सिंदखेडराजा मतदारसंघ सुजलाम सुफलाम होईल गोसेखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पातून वाहून जाणाऱ्या पाण्याचा उपयोग करून पश्रि्चम विदर्भाला दुष्काळमुक्त करण्यासाठीचा महत्वाकांशी प्रकल्प वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प येत्या ७ वर्षांत पूर्ण करण्यात येईल, असे आश्र्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले. या पार्श्र्वभूमीवर आमदार मनोज कायंदे यांनी मुख्यमंत्र्यासहित उपमुख्यमंत्री आणि या विभागाच्या मंत्र्यांना पत्र देऊन वैनगंगा पैनगंगा जोड प्रकल्पामध्ये खडकपूर्णा



प्रकल्पाचा समावेश करावा अशी मागणी केली आहे. त्यामुळे अत्यल्प पर्जन्यमानामुळे पूर्ण क्षमतेने भरू न शकणारा खडकपूर्णा प्रकल्प नदी जोड कालव्यातील पाण्याच्या माध्यमातून भरला जाईल. यातून सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची सोय देखील होईल. आमदार मनोज कायंदे यांच्या या मागणीला यश आल्यास. शेतकऱ्यांचे हिरवे स्वप्न पूर्ण होईल यात शंका नाही

## संक्षिप्त...

### कांदा निर्यात शुल्क कमी करण्यासाठी शेतकऱ्यांचे पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने कांद्यावर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तातडीने कमी करावे या मागणीसाठी नाशिकच्या लासलगाव मध्ये शेतकऱ्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईलने आंदोलन सुरू केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती लासलगाव येथे असलेल्या पाण्याच्या टाकीवर १० ते २० शेतकऱ्यांनी चढून हे आंदोलन सुरू केले असून या आंदोलनामुळे काही काळ लिलाव ठप्प झाले असून पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून आंदोलकांची समजूत घालण्याचा प्रयत्नसुरूआहे.

### पेण मध्ये बॅगेत आढळून आला महिलेचा मृतदेह, जिल्ह्यात खळबळ



दैनिक आपला विदर्भ

**रायगड /प्रतिनिधी :** पेण तालुक्यातील दुरशेत जंगल भागातील रस्त्यावर एका महिलेचा बॅगेत मृतदेह सापडल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. हा मृतदेह कोणीतरी बाहेरून घेऊन येऊन या परिसरात फेकून दिल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेचा पेण पोलिस अधिक तपास करत आहेत.

### औद्योगिक क्षेत्रातील तक्रारी सनियंत्रण करण्यासाठी रायगड समाधान वेब, मोबाईल आधारित प्रणालीचा लोकार्पण सोहळा



दैनिक आपला विदर्भ

**रायगड /प्रतिनिधी :** रायगड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने तसेच महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून रायगड जिल्ह्यातील उद्योजकांना त्यांच्या व्यवसायासाठी भयमुक्त व पोषक वातावरण तयार व्हावे या दृष्टिकोनातून औद्योगिक क्षेत्रातील तक्रारी सनियंत्रण करण्यासाठी रायगड समाधान वेब आणि मोबाईल आधारित संगणक प्रणाली चा लोकार्पण सोहळा विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास खालापूर तालुक्यातील विविध कारखान्यातील अनेक कंपनी व्यवस्थापक उपस्थित होते. या रायगड समाधान या वेब मुळे कारखान्याना तक्रारी करण्यासाठी उपयोगी पडणार आहे.



# डोणगाव येथे मध्यरात्री अग्नी तांडव

## तब्बल नऊ दुकाने जळून खाक : वीस लाखाच्या वर नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/का. प्रतिनिधी : येथील भाजीमंडी परिसरातील दुकानांना आग लागून तब्बल नऊ दुकाने जुळून वीस लाख रुपयांचे वर नुकसान झाल्याची घटना दहा मार्च रोजी मध्यरात्री दरम्यान घडली. या आगीत गोरगरीबाईंची दुकाने जळून खाक झाल्याने त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्र्न निर्माण झाला आहे. दुकाने जळून खाक झाल्यानंतर गोरगरीबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

डोणगाव येथील भाजीमंडी परिसरातील दुकानांना १० मार्च रोजी मध्यरात्री दरम्यान अचानक आग लागली.या आगीत भाजीमंडी परिसरातील तब्बल नऊ दुकाने जळून खाक झाली आहेत. गोरगरीब लोकं आपला सटरफटर व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मात्र, त्यांच्या मेहनतीला नियतीची दृष्ट लागली अन् रात्री अचानक त्यांच्या दुकानांना आग लागली. या आगीत तब्बल नऊ दुकाने जळून नष्ट झाली आहेत. फुले, भाजीपाला व इतर दुकाने अशा नव दुकानाची राख रांगोळी झाल्याने हा किरकोळ व्यवसाय करून उदरनिर्वाह करणारे कुटुंब रस्त्यावर आले आहेत.घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत आगीने तब्बल नऊ दुकाने आपल्या विळख्यात घेत राख रांगोळी केली. नागरिकांच्या सतर्कतेमुळे इतर अनर्थ टळला.सटरफटल व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या गोरगरिबांवर अचानक संकट ओढवल्याने त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्र्न निर्माण झाला आहे. घटनेची माहिती मिळतात दुकानदार व दुकानदाराच्या कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेत पाहू फोडला.



### पंचनामा वरिष्ठांकडे मदतीसाठी पाठवला आला आहे : तहसीलदार निलेश मडके

डोणगाव येथील भाजीमंडी परिसरात १० मार्च रोजी मध्यरात्री च्या दरम्यान अचानक आग लागून तब्बल नऊ दुकाने जळून खाक झाली आहेत. घटनेची माहिती मिळताच तलाठी अमोल राठोड,तलाठी अनुप नरोटे, मंडळ अधिकारी, कोतवाल यांनी घटनास्थळावर धाव घेऊन पंचनामा केला आहे. नऊ दुकानात तब्बल वीस लाखाच्या वर नुकसान झाल्याची माहिती आहे. दुकाने जळालेली लोकही गोरगरीब असून या दुकानावरच त्यांच कुटुंबाचा उदरनिर्वाह होता. पंचनामा शासनाकडे सादर करून मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मदत केल्या जाईल अशी माहिती मेहकर चे तहसीलदार निलेश मडके यांनी दिली आहे.सदर घटनास्थळाची तहसीलदार निलेश मडके यांनी पाहणी केली, यावेळी माजी सभापती राजेंद्र पळसकर. शैलेश सावजी निंबाजी पांडव. राजकीय सामाजिक क्षेत्रातील मंडळीची उपस्थिती होती.

## भाजीमंडीतील आगीत झालेल्या नुकसानीचा पंचनामा

### तब्बल २० लाख २१ हजार रुपयांचे नुकसान

**डोणगाव :** येथील भाजीमंडी परिसरात १० मार्च रोजी सकाळी २ ते ३ वाजताच्या दरम्यान अचानक लागलेल्या आगीत नऊ दुकानातील साहित्य जळून खाक झाल्याने तब्बल २० लाख २१ हजार रुपयांचे नुकसान झाले.या घटनेची माहिती मिळताच महसूल प्रशासनाच्या वतीने डोणगाव चे तलाठी एक व दोन यांनी घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा करून सदर अहवाल वरिष्ठांकडे सादर केला असल्याची माहिती आहे. डोणगाव येथील भाजीमंडी परिसरात १० मार्च रोजी सकाळी २ ते ३ वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली. या आगीमध्ये भाजीपाला, फुल भांडार, जनरल स्टोअर अशा प्रकारच्या तब्बल नऊ दुकानातील साहित्य जळून खाक झाले. या आगीत तब्बल २० लाख २१ हजार रुपयांची नुकसान झाली आहे. या नुकसानीची घटनेची माहिती मिळताच महसूल प्रशासनाच्या वतीने तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. यामध्ये शेख शौकत शेख सोनाजी बागवान यांचे ७५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तर, शकील शहा महबूब शहा यांचे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच शेख इसाक शेख युसूफ आतारा व शेख अहमद शेख युसूफ यांचे सहा लाख पंधरा हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. शांताबाई पांडव व गजानन गाभणे यांचे एक लाख दहा हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. विनोद अशोक वाघमारे यांचे दोन लाख साठ हजार, गणेश अशोक वाघमारे यांचे तीन लाख साठ हजार, शेख तौफीक शेख रहीम यांचे एक लाख पन्नास हजार, लक्ष्मण दत्तात्रय महापुरे यांचे तीन लाख ५० हजार व शेख इब्राहिम शेख संदलजी बागवान यांचे एक लाख रुपयांचे असे एकूण २० लाख २१ हजार रुपयांची नुकसान या आगीमध्ये झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच महसूल प्रशासनाच्या वतीने तलाठी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. सदर पंचनामा वरिष्ठाकडे सादर केला असल्याची माहिती महसूल प्रशासनाच्या वतीने प्राप्त झाली आहे.

## संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आणि बुलढाण्यात स्नेहलला न्याय मिळण्यासाठी धर्मवीर युथ फाऊंडेशनचा जन आक्रोश मोर्चा

**बुलडाणा/प्रतिनिधी :** स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्यावी यासह बुलढाण्यातील त्रिशरण चौकात अपघाती निधन झालेल्या स्नेहलच्या अपघातास जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, या मागण्यांसाठी आज बुलढाण्यात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशी ची शिक्षा देण्यात यावी तसेच बुलढाण्यातील त्रिशरण चौकात झालेल्या स्नेहलच्या अपघातास जबाबदांर असलेल्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी या मागण्यासाठी धर्मवीर फाउंडेशन तर्फे जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. जिजामाता प्रेक्षागार येथून मोर्चाला सुरुवात करण्यात आली असून संगमचौक,जस्तंभचौक, बाजार गल्ली, कारंजा चौक मार्गे जिल्हा अधिकारी कार्यालयावर धडकला आहे. व आपल्या मागण्याचे निवेदन मोर्चेकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.




## विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी केले घंटानाद आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यात, विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले आहे. ज्यात काळ्या फिती लावून कामकाज करीत घंटानाद आंदोलन करण्यात आले. अकोला जिल्हा परिषदेच्या गेट समोर हे आंदोलन करण्यात आले आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून दीड तास कामकाज बंद ठेवले होते. तर शासनाने आमच्या मागण्यांकडे लक्ष न दिल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

## माजी आ. संजय रायमुलकर यांच्याकडून आगग्रस्तांना आर्थिक मदत

### घटनास्थळी जाऊन केली पाहणी

दैनिक आपला विदर्भ



**डोणगाव :** डोणगाव येथील भाजीमंडी परिसरात १० मार्च रोजी सकाळी दोन ते तीन वाजता च्या दरम्यान अचानक आग लागून तब्बल नऊ दुकाने जळून खाक झाले आहेत. त्यामुळे किरकोळ व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे नागरिक रस्त्यावर आले आहेत.या नागरिकांना आर्थिक मदत व्हावी, या उदात्त हतुने माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दुपारी दरम्यान घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. त्याचबरोबर आगग्रस्तांचे सांत्वन करत त्यांना प्रत्येकी दहा हजार रुपयाची आर्थिक मदत केली. त्याचबरोबर शासनाकडूनही मदत मिळवन देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दिले.





येथील भाजीमंडी परिसरात सकाळी दोन ते तीन वाजताच्या दरम्यान अचानक आग लागून भाजीमंडी परिसरातील तब्बल नऊ दुकाने जळून खाक झाले आहेत.या ठिकाणी गोरगरीब नागरिक किरकोळ व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.मात्र, अचानक आग लागल्याने या आगीत तब्बल नऊ दुकानातील साहित्य जळून खाक झाले आहेत. त्यामुळे लाखो रुपयांच नुकसान झाले आहे. आगग्रस्त दुकानदार रस्त्यावर आले आहेत. या दुकानदाराचे कधी न भरून निघणारे नुकसान या आगीत झाली आहे. या नुकसानीतून आधार मिळावा, यासाठी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी आज दुपारी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. त्याचबरोबर आगीमध्ये नुकसान झालेल्या दुकानदाराचे सांत्वन केले. त्या दुकानदारांना कुटुंबातील एक सदस्य या नात्याने प्रत्येकी दहा हजार रुपयांची आर्थिक मदत केली व शासनाकडूनही मदत मिळवून देण्यासाठी मी उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री तथा शासनाकडे पाठपुरावा करून आगग्रस्तांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.असे आश्वासन यावेळी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी दिले.

## बुलढाण्यात वन हक्क व अतिक्रमण धारकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी बेमुदत आमरण उपोषण



**बुलडाणा/प्रतिनिधी :** वन हक्क मान्यता कायद्यानुसार वनपट्टे तात्काळ मंजूर करावेत, वन हक्क कायद्याच्या विसंगत अर्थ लावून जिल्हास्तरीय समितीने वन जावे मंजूर करावे यासह अन्य मागण्यांसाठी आजपासून बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वन हक्क व अतिक्रमण धारकांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले आहे.